संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# निवडणुकांची गुडगुडी आणि थंडीची हुडहुडी

**थंडीचा** अचानकपणे वाढलेला कडाका एकूणच सगळ्यांमध्ये हुडहुडी भरवणारा ठरला आहे. मग अगदी सामान्य माणसापासून ते राजकारण्यांपर्यंत अनेकांचा त्यात समावेश होतो. वाढलेल्या या थंडीमुळे ठरवल्याप्रमाणे अनेक गोष्टी होत नाहीत म्हणजे त्या रद्द कराव्या लागतात किंवा त्यात बदल करावे लागतात. अथवा संरक्षणाची पूर्ण तजवीज करूनच बाहेर पडावे लागते. राजकारण्यांचेही तसेच झाले आहे. सार्वजनिक निवडणुकीच्या गुडगुडीपूर्वी थंडीने भरवलेली ही राजकीय हुडहुडी अनेकांचे अनेक बेत वर खाली करणारी आहे की काय असे वाटू लागते. कारण अजूनही चर्चा समझोते, बोलणी यांच्या बातम्या येत आहेत. डावपेचांची नवनवीन समिकरणे रोज बदलताना दिसत आहेत. आठ दिवसापूर्वी थंडी पळाली असे वाटत असतानाच ती पुन्हा नव्या अवतारात दाखल झाली. अनेक राजकीय पक्षांच्या चर्चा यशस्वी झाल्याची परिस्थिती आठ दिवसापूर्वी होती. पण आता पुन्हा थंडीचा कडाका वाढल्याप्रमाणे सगळ्याच राजकीय पक्षांमध्ये चर्चेचा नवा धडाका सुरु झाल्याचे पाहायला मिळते. भौगोलिक किंवा पर्यावरणातल्या वातावरणाचा असा राजकीय संदर्भ लावणे खरे तर योग्य नाही. पण घटनाच तशा घडत असल्याने किंवा प्रत्यक्ष घटनेशी संबंध नसताना तो केवळ योगायोग समजावा अशा समजुतीप्रमाणे थंडीच्या कडाक्यातल्या या राजकीय चित्रमालिकांकडे पाहावे लागते आणि मग अशा वातावरणामध्ये छोटीशी शेकोटीही दिलासा देणारी वाटते. तशीच परिस्थिती सामाजिक आणि राजकीय वातावरणातही असल्याचे जाणवल्याशिवाय राहात नाही.

### वारंवार होणारे बदल

अर्थात या वारंवार होणाऱ्या पर्यावरणातल्या बदलाचा संदर्भही बघितला पाहिजे. मराठीमध्ये अशी एक म्हण आहे की प्रत्येकाचे दिवस असतात म्हणजे चांगले किंवा वाईट अनुभवायची वेळ आली की त्याचे वर्णन करताना या पध्दतीने सहजपणे केले जाते. आणि ते खरेच आहे. सृष्टीचक्र किंवा एकूणच नियतीच्या चक्रामध्ये प्रत्येकाचे दिवस असतातच. सृष्टीचक्राचा विचार केला तर सध्या थंडीचे दिवस आहेत. फरक फक्त एवढाच आहे की ही थंडी अगदी फेब्रुवारी महिन्याच्या शेवटापर्यंत टिकेल अशी काही कोणाला खात्री नव्हती. साधारणपणे गेल्या पंधरा वीस वर्षाचा अनुभव बघितला तर जानेवारीच्या अखेरीपर्यंत थंडीचा हंगाम आपला गाशा गुंडाळतो. आणि बऱ्यापैकी उकाड्याला सुरुवात होते. यंदा मात्र थंडीने आपला मुक्काम चांगलाच वाढवला आहे. अर्थात त्याला कारणेही तशीच घडली आहेत. त्यामध्ये हिमवर्षाव होण्यापासून समुद्रात कमी जास्त दाबाचे पट्टे निर्माण होण्याचे प्रकार कारणीभूत आहेत. शेवटी हा सगळा निसर्गाचा अधिकार असल्याने त्याची फारशी कारण मिमांसा करता येणार नाही. परंतु अनपेक्षितपणे या गोष्टी घडत असल्याने त्याविषयी कुतूहल वाटणे स्वाभाविक ठरते. यंदा देशाच्या काय किंवा अगदी महाराष्ट्राच्या अनेक गावांमध्ये थंडीने आपले विक्रम मोडले आहेत. हिवाळ्यात दिल्लीत गारांचा पाऊस हा प्रकार खूप वर्षांनी घडला. तर महाराष्ट्राच्या काही भागातही पाऊस आणि काही प्रमाणात गारपीट प्रकार घडून आला. परंतु तापमान काही ठिकाणी अगदी दोन डिग्री सेल्सियसपेक्षा खाली येण्याचा किंवा मुंबईसारख्या दमट हवामान असलेल्या भागात तेरा ते पंधरा डिग्री सेल्सियस पर्यंत तापमान  खाली येण्याचा प्रकार बऱ्याच वर्षानंतर घडला. हवामानातला हा बदल त्याच्या लहरीपणाचा भाग ठरतो. मात्र ज्यावेळी एकूणच संपूर्ण विश्वातल्या हवामानाचा विचार होतो तेव्हा गेल्या पंचवीस वर्षात खूप वेगाने किंवा वारंवार अथवा अचानक बदल होताना दिसून येतात. अशा बदलांमुळे निश्चितच समाजजीवनावर परिणाम होत असतो. मग अगदी पीकपाण्यावर येणाऱ्या संकटापासून ते रोग,व्याधी यांचे प्रमाण वाढल्याने अनेक गोष्टींचा त्यात समावेश होतो. अशा अर्थाने ज्याचे त्याचे दिवस असतात या म्हणीप्रमाणे थंडीचे हे दिवस हुडहुडी भरवणारेच म्हणावे लागतात.

### शेकोटीशिवाय शेकून काढणार

स्वाभाविकपणे वारंवार बदल घडवणाऱ्या हवामानाचा अभ्यास तर झाला पाहिजे. त्यातून निश्चितच काही निष्कर्ष हाती लागू शकतील. अर्थातच अनुभवाचाही भाग असा आहे की थंडी जेवढी कडाक्याची तितकाच उन्हाळाही कडाक्याचा जातो. आणि याच उन्हाळ्याच्या कडाक्यानंतर पावसाचे प्रमाणही जास्त राहू शकते. तीनही ऋतूंचे हे प्रभाव एका विशिष्ट मर्यादेपर्यंत लक्षात घेतले जातात. परंतु त्यात नेहमीपेक्षा थोडा वेगळा बदल झाला  की मग मात्र त्याचे दुष्परिणामही समोर येऊ लागतात. थंडीच्या कडाक्याचे दुष्परिणाम जाणवत असतानाच यंदा तर पाऊसही कमी झालेला आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यात निम्म्यापेक्षा जास्त भाग दुष्काळाच्या सावटाखाली आहे. अशा परिस्थितीत जर उन्हाळ्यानेही आपला प्रभाव दाखवला तर आधीच पाणी टंचाईने ग्रासलेल्या महाराष्ट्राला तो कडक उन्हाळा आणखी भाजून काढू शकतो. सध्या तर राजकारण्यांना लोकांच्या कोणत्याच समस्येकडे लक्ष द्यायला वेळ नाही त्यांच्याकरीता निवडणुका हाच सध्या महत्वाचा हंगाम आहे. परंतु तिथेही यावेळी मतदार आपला प्रभाव दाखवतील अशी भीती वाटल्याने त्यांच्याही अंगामध्ये हुडहुडी भरल्यासारखेच पाहायला मिळते. थंडीच्या कडाक्यात निदान शेकोटीचा थोडाफार आधार तरी मिळतो. परंतु यंदा मतदार राजकीय पक्षांविषयी फारशी दयामाया दाखवणार नाहीत अशी परिस्थिती आहे. तेव्हा केवळ आश्वासने देऊन जनतेची फसवणूक करणाऱ्यांना मतदार शेकोटीशिवाय शेकून काढतील असेच एकूण चित्र दिसते. म्हणूनच यंदाची ही थंडी काही काळापुरती का होईना परंतु एकूणच वातावरणात हुडहुडी भरवणारी आहे. हवामानातले वारंवार बदल जसे त्याचे दुष्परिणाम दाखवतात. तसेच राजकारण्यांच्या वागण्या बोलण्यात वारंवार होणारे बदल आगामी राजकीय हंगामामध्ये दुष्परिणाम दाखवणारेच म्हणावे लागतील. या दृष्टीकोनातूनही सहजपणाने या थंडीचा विचार केला तर समाजजीवनाबरोबर राजकीय जीवनावरही त्याचा परिणाम दिसू लागलेला आहे. याला कोण कसे सामोरे जातो यावर बरेच काही अवलंबून असते.